सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT




# ‘खातगाव’च्या विद्यार्थ्यांची नावे थेट चंद्रावर

### ‘नासा’च्या आवाहनाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.५ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील खातगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. १ येथील २३ विद्यार्थी व दोन शिक्षकांची नावे थेट चंद्रावर पाठवली जाणार आहेत. नासा अर्थात आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थेच्या आर्टेमिस-२ मोहिमेत त्यांचा ऐतिहासिक सहभाग नोंदविला जाणार आहे.

दरम्यान, शाळेच्या वैभवात भर टाकणारे आणि अभिमानाचे साक्षीदार असणारे या विद्यार्थ्यांच्या नावांचे बोर्डिंग




पास ‘नासा’कडून देण्यात आले आहेत. तब्बल ५४ वर्षांनी नासा चंद्रावर चार अंतराळवीर पाठवणार आहे. या मोहिमेत वर्चुअल गेस्ट म्हणून सहभागी होण्याबाबत नासाने आवाहन केले होते. या उपक्रमात खातगाव नं.१ शाळेने विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरित्या नोंदणी केल्यानंतर नासाकडून त्यांना बोर्डिंग पास पाठविण्यात आले. या विद्यार्थ्यांची नावे एका एसडी कार्ड मध्ये संग्रहित करून ओरियन यानाद्वारे चंद्राकडे पाठविले जाणार आहेत. समीना शेख, रुकसार शेख, शुभांगी पल्लारे, तेजस कोकरे, कार्तिकी कोकरे, गणेश आरदड, सफिया शेख, राधिका कोकरे, सार्थक वाघमोडे, कल्याणी आरदड, अक्षरा कोकरे, श्रेया कोकरे, वेदिका धायगुडे, श्रेयश धायगुडे, करण पल्लारे, शिवराज कवडे, जयवर्धन झेंडे, राजवीर गुळवे, दिलशाद शेख, तनुजा कोकरे, श्रेया झेंडे, वेदिका कोकरे, आदित्य कोकरे या विद्यार्थ्यांचे व शिक्षक बाळासाहेब बोडखे, बिभीषण सातपुते यांच्या नावांचा यात समावेश आहे. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आयसीटी शिक्षक विक्रम आडसूळ यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक बाळासाहेब बोडखे यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल म्हणून यामध्ये सहभाग नोंदवला. शिक्षणाधिकारी शेख, गटशिक्षणाधिकारी नितीन कदम, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलावडे, जगताप मॅडम, मिनीनाथ टकले यांनी या सर्वांचे कौतुक केले.



**६ लाख ८५ हजार मैलाचा प्रवास :** आर्टेमिस-२ ही मोहीम एप्रिल २०२६ पूर्वी फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटर इथून प्रक्षेपित होईल. अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे सुमारे ६ लाख ८५ हजार मैलाचा प्रवास करुन पॅसिफिक महासागरात परतणार आहेत.

# आवश्यकतेनुसार हात वर करून होणार मतदान

- महापौर व उपमहापौर निवडीसाठी महापालिकेत आज विशेष सभा
- महापालिका कौन्सिल हॉल सभागृहात जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सार्वत्रिक निवडणुकीनंतर सोलापूर महानगरपालिकेची पहिली विशेष सभा शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी रोजी स. ११ वाजता कौन्सिल हॉलमध्ये होणार आहे. या सभेत अडीच वर्षांसाठी महापौर व उपमहापौरांची निवड केली जाणार आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी राहणार आहेत. आवश्यकतेनुसार निवडणूक प्रक्रिया हात वर करून मतदानाने पार पडणार आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर व उपम हापौर पदांसाठी निवडणूक घेणे) नियम, २००५ तसेच विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. नपाप्र/४/कावि/५१/२०२६, दि. २३ जानेवारी २०२६ अन्वये सार्वत्रिक निवडणुकीनंतर सोलापूर महानगरपालिकेची पहिली विशेष सभा शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या कै. यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

या सभेच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा सोलापूरचे अपर जिल्हाधिकारी



गणेश निऱ्हाळी हे राहणार आहेत. महाराष्ट्र म हानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ (१) नुसार सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीत अडीच वर्षांच्या कालावधीसाठी महापौर व उपमहापौरांची निवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार महापौर पद हे अनारक्षित (खुल्या) प्रवर्गासाठी राहणार आहे. सोलापूर महानगरपालिकेचे नगरसचिव प्रविण दंतकाळे यांनी याबाबतची कार्यपत्रिका क्र. १ प्रसिद्ध केली आहे. ही कार्यपत्रिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ अंतर्गत काढण्यात आली आहे.

सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी महापौर व उपमहापौर पदासाठी इच्छुक उमेदवारांसाठीची नामनिर्दे शन पत्रे नगरसचिव कार्यालयात स्वीकारण्यात आली आहेत. सभागृहात उपस्थित राहणाऱ्या सदस्यांनी शासनमान्य ओळखपत्र तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत बाळगणे आवश्यक असल्याचेही सूचित करण्यात आले आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी तसेच उमेदवारी परत घेण्याची प्रक्रिया शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सभा सुरू झाल्यानंतर नियमांनुसार पार पडणार आहे.पिठासीन अधिकारी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी हे राहणार आहेत.

यावेळी सुरुवातीला अर्ज छाननी, अंतिम उमेदवार यादी जाहीर करणे त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटे वेळ दिला जाणार आहे. दरम्यान, आवश्यकतेनुसार मतदान हात वर करून घेतले जाणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर व उपमहापौर पदांसाठी निवडणूक घेणे) नियम, २००५ मधील नियम ७ (३) नुसार हात वर करून मतदान करण्यात येणार आहे. या सभेसाठी महापालिकेतील कै. यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात जय्यत तयारी करण्यात आली आहे.

**महापौर-उपमहापौर निवडणूक उमेदवारी चित्र**

महापौर पदासाठी उमेदवार

भाजप : विनायक रामकृष्ण कोंड्याल
शिवसेना (शिंदे गट) : प्रियदर्शन बाळासाहेब साठे
एमआयएम : तौफिक बाबुमियाँ हत्तुरे.

**उपमहापौर पदासाठी उमेदवार**

भाजप : ज्ञानेश्वरी महेश देवकर
शिवसेना (शिंदे गट) : प्रियदर्शन बाळासाहेब साठे
एमएमएम : आसिफ अहमद पीर अहमद शेख.

# ९ दिवसांत १२ लाख टन सोयाबीन खरेदीचे आव्हान

### हमीभाव खरेदी केंद्रांकडे शेतकऱ्यांनी फिरविली पाठ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी शासनाने १२ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली असली, तरी प्रत्यक्षात खरेदी उद्दिष्ट गाठणे कठीण ठरणार आहे. खरेदी केंद्रे उशिरा सुरु झाल्याने शेतकऱ्यांनी हमीभाव केंद्रांकडे पाठ फिरवली. त्यातच बाजारातील सोयाबीनचे दर हमीभावाच्या पुढे गेल्याने शेतकरी केंद्रांकडे फिरकण्याची शक्यता कमी झाली आहे. परिणामी, ९ दिवसांत १२ लाख टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे मोठे आव्हान राज्य सरकार समोर उभे राहिले आहे.

केंद्र सरकारने महाराष्ट्राला १८ लाख ५० हजार टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट दिले आहे. यासाठी राज्यात नाफेड व एनसीसीएफ या दोन संस्थांमार्फत १,०६८ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ ९३४ केंद्रांवरच खरेदी सुरू झाली. हमीभाव प्रतिक्विंटल ५,३२८ रुपये असताना, सध्या सोलापूरसह राज्यातील अनेक बाजारांत सोयाबीनचे दर ५,६०० रुपये व त्याहून अधिक असल्याने हमीभाव केंद्रे शेतकऱ्यांसाठी अप्रासंगिक ठरत आहेत. आतापर्यंत राज्यात २ लाख ३९ हजार ३३६ शेतकऱ्यांकडून ६ लाख ३ हजार ३२१ टन सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत अजूनही १२ लाख टनांहून अधिक सोयाबीनची खरेदी बाकी आहे. सोलापूर जिल्ह्यात २१ जानेवारीअखेर १,७४४ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी केवळ ५८४ शेतकऱ्यांकडून १२,२७० क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली. त्यानंतर खरेदी जवळपास थांबली आहे.

**उडीद बाजारातून गायब**

अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने मुगाची हमीभावाने खरेदी होऊ शकली नाही. मात्र, सोयाबीनसोबत उडीद खरेदीसाठी केंद्रे सुरु करण्यात आली होती. सोलापूर जिल्ह्यात नोंदणी केलेल्या ७६४ शेतकऱ्यांपैकी फक्त २१९ शेतकऱ्यांनी २,३७७ क्विंटल उडीद हमीभावाने विक्री केला. सध्या बाजार समित्यांमध्ये उडीदाची आवक नाममात्र असून ती जवळपास बाजारातून गायब झाली आहे.

**शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत असल्याचे समाधानकारक चित्र**

हमीभाव खरेदीचा उद्देश शेतकऱ्यांना किमान दर मिळावा हा आहे. सध्या बाजारातील सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा जास्त असल्याने खरेदी केंद्रांना प्रतिसाद मिळत नाही. शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत असल्याचे समाधानकारक चित्र आहे, असे जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी सांगितले.

# नदीपात्रात वाहनांचा शिरकाव; जिल्ह्यातील वाळू उपशावर पाच दिवसांची स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यातील काही वाळू ठेक्यांवर नदीपात्रात वाहने घालून वाळू उपसा केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे व लवंगी तर मंगळवेढा तालुक्यातील मिरीतांडोर येथील वाळू उपशावर पाच दिवसांची स्थगिती देण्यात आली आहे. तहसीलदारांच्या प्रत्यक्ष तपासणीनंतरच उपशाला ‘ग्रीन सिग्नल’ दिला जाणार आहे.

राष्ट्रीय हरित लवादाने नदीपात्रातून फक्त पारंपरिक पद्धतीने वाळू उपसा करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यानुसार जेसीबी, ट्रक किंवा अन्य यांत्रिक साधने नदीपात्रात नेण्यास सक्त मनाई आहे. मात्र, भंडारकवठे परिसरात नदीपात्रात वाहने गेल्याचा व्हिडिओ पुरावा जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. त्याची दखल घेत प्रशासनाने तातडीने उपशावर बंदी घातली.जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्दे शानुसार संबंधित ठिकाणी तहसीलदारांनी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करणे, सविस्तर अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तोपर्यंत वाळू उपसा पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित ठेकेदारांनाही नियमांचे पालन करण्याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. मागील चार वर्षांपासून जिल्ह्यात वाळू उपसा बंद होता. नव्या वाळू धोरणानुसार नुकतेच लिलाव काढण्यात आले होते. त्यापैकी केवळ तीन ठिकाणी उपशाला परवानगी देण्यात आली होती.

**तक्रारीनंतर वाळू उपशाला स्थगिती**

“नदीपात्रात वाहने नेण्यास परवानगी नाही. तक्रारीनंतर वाळू उपशाला स्थगिती देण्यात आली असून, पुढील योग्य तपासणीनंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.

**- संतोष देशमुख, महसूल उपजिल्हाधिकारी**

## इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची मुदतवाढ

**सोलापूर :** इयत्ता चौथी व इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा आवेदन पत्र नियमित शुल्कासह भरण्याची मुदत १३ फेब्रुवारी पर्यंत वाढविण्यात आली आहे. इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील २९ हजार ६८ विद्यार्थ्यांनी तर सातवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १५ हजार ४८४ विद्यार्थ्यांनी पत्र भरली आहेत.

ही शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी होणार आहे. झेडपी शाळेत शिक्षण घेत असलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी सेस निधीतून भरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी शैक्षणिक स्पर्धेत ही आघाडीवर राहावेत हा यामागील उद्देश आहे, असे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

# उच्च शिक्षण लेखाधिकारी कार्यालयात भ्रष्टाचाराचा ‘बाजार’

- कामांसाठी उघड दराची निश्चिती!
- १० बाय १०च्या खोलीतून चालतो कारभार
- लक्ष्मी प्रसन्न झाल्याशिवाय फाईल जागेवरुन हलेना

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाचे सोलापूर येथील लेखाधिकारी कार्यालय सध्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आवारात असलेल्या एका १० बाय १० च्या छोट्याशा खोलीतून हा सर्व कारभार चालतो. या कार्यालयाची जबाबदारी एकाच लेखाधिकाऱ्यावर असून, आठवड्यातून केवळ एकच दिवस (सोमवारी) ते कार्यालयात उपस्थित असतात. याच एका दिवसात कामांचा डोंगर आणि आर्थिक तडजोडींचे व्यवहार पूर्ण केले जातात, असा आरोप सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनकडून होत आहे.

**एकाच दिवशी काम, अर्थकारण**

सोमवारी लेखाधिकारी कार्यालयात आल्यानंतर ऑडिटमधील त्रुटींवर चर्चा करणे, सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र देणे आणि वेतन निश्चितीची पडताळणी करणे अशा कामांसाठी गर्दी होते. ही सर्व कामे महाविद्यालयाने नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यामार्फत केली जातात. मात्र, ही प्रक्रिया विनासायास पार पडण्यासाठी लक्ष्मी प्रसन्न करणे अनिवार्य असल्याचा कॉलेज कर्मचारी युनियनचा दावा आहे.




**त्रुटी काढा आणि तडजोड करा!**

मंगळवार ते शुक्रवार दरम्यान महाविद्यालयांना भेटी देऊन वेतन व वेतनेतर अनुदान नियमाप्रमाणे खर्च झाले आहे का, याची तपासणी करणे हे लेखाधिकाऱ्यांचे मुख्य काम आहे. मात्र, या तपासणीत जाणीवपूर्वक नियमबाह्य रकमेच्या त्रुटी काढल्या जातात. जर संबंधितांनी आर्थिक तडजोड केली, तर त्या त्रुटी अहवालातून गायब होतात; अन्यथा त्या तशाच ठेवून कर्मचाऱ्यांना वेठीस धरले जाते.

**भ्रष्टाचाराचे कथित रेट कार्ड**

लेखाधिकारी कार्यालयात विविध कामांसाठी याप्रमाणे आर्थिक व्यवहार चालत असल्याचा कॉलेज कर्मचारी युनियनचा दावा आहे.

**सेवानिवृत्तीसाठी अंतिम वेतन प्रमाणपत्र**

शिक्षकेतर : १ ते २ हजार
प्राध्यापक : ५ ते १० हजार

**वेतन निश्चिती पडताळणी**

शिक्षकेतर : २ ते ५ हजार
प्राध्यापक : ५ ते २५ हजार.

**उच्च शिक्षण मंत्र्यांकडे तक्रार करणार**

“लेखाधिकारी कार्यालयातील कोणतेही काम आर्थिक देवाणघेवाणीशिवाय होत नाही. या कार्यालयाने भ्रष्टाचाराचा कळस गाठला असून, या संपूर्ण प्रकरणाची पुराव्यासह उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे तक्रार करण्यात येईल.”

**- दत्ता भोसले, अध्यक्ष, कॉलेज कर्मचारी युनियन.**

**कोणत्याही प्रकारची रक्कम घेत नाही.**

“मी प्राध्यापक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची रक्कम घेत नाही. जर महाविद्यालयाचा एखादा कर्मचारी स्वतःहून पैसे घेत असेल, तर त्याबाबत मला कोणतीही माहिती नाही.”

**- गोविंद बोंदर, लेखाधिकारी**




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३४८

**तुका म्हणे काळें चेपियला गळा ।
मी मी वेळोवेळा करीतसे ।।**

प्रत्येक माणूस रिक्त हाताने जन्माला येतो आणि रिक्त हातानेच हा देह सोडतो. हे सत्य असले तरीही आयुष्यभर हे मी केले, ते मी केले, इथे मी नसतो तर असे झाले असते, तसे झाले असते, माझ्या मुळेच हे शक्य झाले वगैरे वगैरे.अर्थात, मी-मी म्हणून मिरविण्यात माणसाला मोठेपणा वाटत असतो. स्वत:च निर्माण केलेला हा मी टिकविण्यासाठी माणूस आयुष्यभर नको त्या गोष्टी करीत असतो. मूळात कांहीच अस्तित्व नसणारा नाशवंत मी माणसाचे सर्वस्व लुटून नेतो. मी मुळे संकटे आली तरी माणूस मी ला सोडत नाही. मीत गुरफटलेल्या माणसाला मी च्या जाळ्यातून बाहेर पडणे अवघड होऊन बसते. ज्याच्याकडे मी आहे त्याच्याकडे अहंकार, स्वार्थ, ईर्ष्या, द्वेष, मत्सर हे सर्व शत्रू स्थान पक्के करुन बसलेले असतात. मी मुळे निर्माण होणारा दुर्गंध माणसाला सुगंध वाटू लागतो. मी ला काढण्याचा जसजसा प्रयन्त करावा, तसे तसे हा मी बळावत जातो. मी मुळे येणाऱ्या संकटातून तरी माणसाने त्याला काढून टाकण्याचा विचार केला पाहिजे. वरकरणी मी ला काढून टाकण्याचा प्रयन्त उलट मीला पक्के करीत असतो. त्याला काढून टाकण्यासाठी मनाचा निग्रह लागतो. मी ला काढून टाकणे प्रयन्ताअंती शक्यही आहे. मी ला बाळगणारा माणूस लहान-सहान गोष्टीत मी ला पुष्टी देत असतो. माझे-माझे म्हणण्यामुळे माणूस स्वत:पासून दुरावत जातो. हा देह ज्याच्या कृपेने मिळाला, त्याला सर्वस्व अर्पण करुन आनंदी राहण्याची सदबुध्दी माणसाला सुचत नाही. मी मुळे अहंकार बळावत असल्याने अहंकारी माणसाजवळ कोणीही मन:पूर्वक राहात नाही. मी मुळे माणूस एकाकी पडतो, तरीपण त्याला हा मी आवडत असतो. मी माणसाला कर्मात आणि त्याच्या फलात गुंतवित असतो. ज्या ठिकाणी मी चा दुर्गंध आहे, तेथे भगवंत असत नाही. भगवंत हा प्राणीमात्रांच्या रुपात वास्तव्य करुन असल्याने हा प्राणीमात्ररुपी भगवंत अशा मी बाळगणाऱ्यांपासून दूर राहातो. अर्थात, अहंकारी माणसापासून इतर माणसं दूर जातात. संत कबीरांनी म्हटले आहे, जब मैं था तब हरी नहीं । अब हरी हैं मैं नहीं ।। अर्थात, जोपर्यंत माणूस मी ला जवळ ठेवतो तोपर्यंत भगवंत, लोक जवळ येत नाहीत. हे जवळ तेव्हाच येतात जेव्हा माणसातील मी निघून जातो.



माणूस मी मध्ये इतका गुरफटला जातो की, साक्षात काळ जेव्हा कायमचे घेऊन जाण्यासाठी समोर उभा राहतो, तेव्हाही माणूस मी-मीच म्हणत असतो. हे सांगतांना महाराज म्हणतात, तुका म्हणे काळें चेपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ।। आपला मृत्यू डोळयासमोर उभा असतांना माणूस जमवाजमवीसाठी धडपडतच असतो. मृत्यूशय्येवर पडूनसुध्दा मला हे करायचे आहे, ते करायचे आहे, मी हे करेन, ते करेन असा विचार माणूस सोडत नाही. माणसाने आशावादी आवश्य असावे, पण मी वादी असू नये. मी हा माणसाला त्याचा स्वत:चा परिचय होऊ देत नाही. डोळयावर अहंकाराची पटटी चढवुन वैचारिक अंध:कार निर्माण करण्याचे कार्य मी कडून घडत असल्याने या मी ला आपण कायमचे नष्ट केले पाहिजे. मीतून मुक्त होणारा माणूस मानवी जीवनाचे महत्व जाणू व अनुभवू शकतो. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. ६ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ तृतीया**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- हस्त (२४.२३)**
**योग - धृति (२३.३६)**
**करण - कौलव (१२.४४)**
**राहू काल :**
**शुक्रवार : दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
१९६८: फ्रांसमध्ये ग्रेनोबल येथे दहावे हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.
१९५९: जॅक किल्बी यांनी इंटिग्रेटेड सर्किटसाठी पहिला पेटंट घेतला.
१९५२: इंग्लंडचा राजा जॉर्ज (सहावा)निधन झाले आणि एलिझाबेथ (दुसरी) गादीवर बसली.
१९४२: दुसरे महायुद्ध इंग्लंडने थायलँडविरुद्ध युद्ध पुकारले.

## युवकांसाठी वीरव्रत साहस दौरा; रॉक क्लाइंबिंग, रिव्हर क्रॉसिंग व रॅपेलिंगचा अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
युवकांमध्ये धैर्य, आत्म विश्वास, निर्णयक्षमता व नेतृत्वगुण घडविण्याच्या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनी - सोलापूर यांच्या वतीने युवकांसाठी विशेष वीरव्रत साहस दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा दौरा साहस, शिस्त आणि संघभावना यांचा प्रत्यक्ष अनुभव देणारा ठरणार आहे.

या १० दिवसांच्या दौऱ्यात शिमला येथे आयोजित साहस शिबिरात युवकांना रॉक क्लाइंबिंग, रिव्हर क्रॉसिंग, रॅपेलिंग, ट्रेकिंग व रॉक स्क्रॅम्बलिंग यांसारख्या साहस उपक्रमांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.सुरक्षतेची सर्व काळजी घेऊन अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली होणारे हे उपक्रम युवकांच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा कस पाहणारे असतील. या साहस उपक्रमांसोबतच वीरगाथा सत्रे, उपासना व चर्चासत्रे यांच्या माध्यमातून धैर्य, शिस्त, देशभक्ती आणि जबाबदारीची भावना दृढ केली जाणार आहे. वीरव्रत अंतर्गत युवकांना शिमला, दिल्ली, मथुरा व आग्रा या ठिकाणी भेट देण्याची संधी मिळणार असून, नवीन संसद भवन, इंडिया गेट, लोटस टेंपल, श्रीकृष्ण जन्मस्थळ व ताजमहाल अशा प्रेरणादायी स्थळांना भेटी दिल्या जाणार आहेत. हा साहस दौरा दि. २१ एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान होणार असून (जाता-येता थर्ड टियर ए.सी. रेल्वे प्रवासासह) नाव नोंदणी दि. १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत करावे.

रेल्वे आरक्षण मर्यादित असल्याने इच्छुक युवकांनी तात्काळ नोंदणी करावी. धैर्याला दिशा देणारा, आत्मविश्वास घडविणारा आणि नेतृत्व निर्माण करणारा हा वीरव्रत साहस दौरा युवकांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे. इच्छुकांनी श्रेयस जहागीरदार (मो. ९४०५६४२२०३ अथवा (०२१७-२३१७७८२) या नंबरवर संपर्क साधावा.

# पहिल्याच वर्षात आयओसीएल पाकणी साइडिंगमधून रेक लोडिंगचे त्रिशतक पूर्ण

### ३०१ रेकच्या लोडिंगसह मालवाहतूकीत ४४.२ कोटी रुपयांची मजबूत वाढ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने, सोलापूर जिल्ह्यातील आयओसीएल पाकणी साइडिंगवर जानेवारी २०२६ पर्यंत पेट्रोलियम उत्पादनांच्या लोडिंगमध्ये मजबूत आणि सातत्यपूर्ण वाढ नोंदवून मालवाहतूक कामकाजात महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

आयओसीएल पाकणी साइडिंगवर पेट्रोलियम, तेल आणि वंगण लोडिंगची पहिली कार्यवाही २८ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आली, जी भारतीय रेल्वे आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडसाठी एक ऐतिहासिक घटना ठरली. कामकाज सुरू झाल्यापासून, वर्षाभरातील कामगिरी अत्यंत समाधानकारक राहिली आहे. जानेवारी २०२६ पर्यंत ३०१ रेक यशस्वीरित्या लोड करण्यात आले. सोलापूर विभागासाठी ४४.२ कोटी रुपयांचा मालवाहतूक महसूल निर्माण झाला.



पाकणी येथून सेवा दिली जाणारी प्रमुख गंतव्यस्थानांमध्ये हिरेनंदुरू कर्नाटक, मिरज महाराष्ट्र, विजयपुरा कर्नाटक, देसूर कर्नाटक, नवलूर कर्नाटक, रामगुंडम तेलंगणा हे अनेक राज्यांमध्ये व्यापक प्रादेशिक कनेक्टिव्हिटी दर्शवते.पाकणी साइडिंग विविध प्रकारची पेट्रोलियम उत्पादने हाताळते, जसे की हाय स्पीड डिझेल, मोटर स्पिरिट हे कार्यक्षम, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक रेल्वे मार्गाने इंधनाच्या वाहतुकीस मदत करते.

आयओसीएल पाकणी साइडिंग एक धोरणात्मकदृष्ट्या महत्वाचे लॉजिस्टिक केंद्र म्हणून उदयास आले आहे. ही महाराष्ट्रातील पहिली आयओसीएलरेक-लोडिंग सुविधा, भारतातील आयओसीएलचे ९वे विशेष मार्केटिंग रेक-लोडिंग ठिकाण आणि देशभरातील रिफायनरीसह एकूण १८वे ठिकाण बनले आहे.

आयओसीएल पाकणी साइडिंगवर पेट्रोलियम उत्पादनांच्या लोडिंगमधील दमदार कामगिरी ही भारतीय रेल्वे आणि आयओसीएल यांच्यातील प्रभावी समन्वयाचा पुरावा आहे. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग मालवाहतूक क्षमता वाढवण्यासाठी, महसूल वाढवण्यासाठी आणि महाराष्ट्र, शेजारील राज्ये व संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे.



## सोलापूरचे चित्रकार सचिन खरात यांचा दिल्लीमध्ये सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
शहरातील प्रसिद्ध चित्रकार सचिन खरात यांचा भारतीय चित्रशैली योगदानाबद्दल मथुरा (उत्तर प्रदेश) येथील पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठाकडून नुकताच नवी दिल्ली येथे गौरव करण्यात आला. नवी दिल्लीच्या हॉटेल रेडिसन ब्ल्यू मध्ये झालेल्या कार्यक्रमात कुलपती अरविंद कुमार ठाणे इंद्र भूषण मिश्रा यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पंडित दिनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठाने राष्ट्रीय हिंदी संगोष्टी समारोहाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यालयाचे माजी कुलगुरू अरविंद कुमार यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंडित दिनदयाल विद्यापीठाचे कुलपती इंद्रभूषण मिश्रा होते. चित्रकार सचिन खरात यांनी भारतीय चित्रशैलीच्या माध्यमातून रेखाटलेली चित्रे देश परदेशात पोहोचली आहेत.



## यमाईदेवी शाळेत दिव्यकांत गांधी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे राष्ट्रभक्त, समाजसेवक दिव्यकांत गांधी यांना गुजराती मित्र मंडळ सोलापूर यांच्यातर्फे दिला जाणारा स्वर्गीय महेंद्रभाई शाह स्मृती गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अशोक लांबतुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी, स्मृती गांधी, प्रित्येश गांधी, रोशन शेख, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदीप चव्हाण व विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी स्वागत गीतांनी स्वागत करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा परिचय व जीवन कार्याविषयी माहिती तानाजी तानगावडे यांनी सांगितली.

प्रास्तावीक मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी यांनी केले तर सूत्रसंचालन तानाजी तानगावडे यांनी केले. नानासाहेब लोखंडे यांनी आभार मानले.

## अनैतिक संबंधाच्या वादातून दुहेरी खून; पाच आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
अनैतिक संबंधाच्या वादातून श्रीकांत अनिल नरुटे, वय २२ व अनिता चनबसप्पा सलगरे वय २९ दोघे रा.नांदणी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर यांना जीवे ठार मारल्या प्रकरणी चनबसप्पा रेवप्पा सलगरे, नागप्पा उर्फ नागनाथ रामा माने, उमेश सुरेश सलगरे, कल्लाप्पा सिद्धाराम सलगरे, लक्ष्मण चंद्रशा सलगरे यांच्यावर भरलेल्या खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांचे समोर होऊन त्यांनी पुराव्याअभावी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात हकीकत अशी की, चनबसप्पा सलगरे व मयत श्रीकांत नरुटे यांची शेती एकमेकांजवळ होती व त्यांच्यात बोलणे चालणे होते. त्यामुळे चनबसप्पा याची पत्नी व मयत श्रीकांत यांच्यामध्ये अनैतिक संबंध असल्याच्या चनबसप्पा यांस संशय होता. दि. १०/४/२०२४ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास सलगरे वस्ती कडून शिवीगाळ व आरडाओरडाचा आवाज ऐकू आल्यामुळे अनिल नरुटे व त्याची पत्नी हे त्या ठिकाणी गेले असता, मयत श्रीकांत यांस खाली पाडून तुला सोडणार नाही तुला खलास करतो असे म्हणून शिवीगाळ करीत होता तसेच चनबसप्पा याची बायको तिला देखील मारहाण झाल्यामुळे ती विव्हळत खाली पडलेली होती.

आरोपी उमेश सलगरे, लक्ष्मण सलगरे, कल्लाप्पा सलगरे, नागप्पा माने हे श्रीकांत व अनिता यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत होते, त्यावेळी श्रीकांत याचे वडील अनिल हे सोडवण्यासाठी मध्ये गेले असता त्यांना ढकलून दिले व त्यांच्या पत्नीला देखील मारहाण केली त्यावेळी त्यांना चनबसप्पा सलगरे याने श्रीकांत याच्या डोकीत गळ्यावर व मानेवर कुऱ्हाडीने गंभीरवार करून जीवे ठार मारले, त्यानंतर त्याची पत्नी अनिता ही दरवाजासमोर पडली असताना तिच्या देखील गळ्यावर डोकीत कुऱ्हाडीने वार करून जिवे ठार मारले. चनबसप्पा व इतर आरोपी हे मोटरसायकलवर निघून गेले, उपचारार्थ ग्रामीण रुग्णालय मंद्रूप येथे दोघांना घेऊन गेले असता तेथे डॉक्टरांनी दोघांनाही मयत घोषित केले, अशा आशयाची फिर्याद मयत श्रीकांत याचे वडील अनिल नरुटे यांनी मंद्रूप पोलीस ठाण्यात दिले होते. सदर खटल्याचा तपास करून पोलिसांनी न्यायालयात दोषारोप पत्रक दाखल केले होते.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकंदर ११ साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याचे सुनावणी वेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी आपले युक्तीवादात, दोन्ही नेत्र साक्षीदाराने दिलेल्या साक्षींचे अवलोकन केले असता, त्यांची साक्ष ही विश्वासार्ह नसल्याचे अनेक मुद्दे न्यायालयासमोर मांडले, त्या पृष्ठयार्थ उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले त्यावरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश मनोज शर्मा यांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपी तर्फे मिलिंद थोबडे, अभिजीत इटकर, डी. आय. कांबळे, संजय कांबळे, फैयाज शेख यांनी तर सरकार पक्षातर्फे ए. जी. कुर्डुकर आदी वकिलांनी काम पाहिले.




## छत्रपती शिवाजी महाराज जयंती नियोजन बैठक उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती साजरी होणार आहे. संभाजी आरमार दरवर्षी मोठया थाटात जयंती वेगवेगळ्या उपक्रमानी साजरी करत असते. यंदाही १९ फेब्रुवारी रोजी शाही पालखी सोहळा आयोजित केला आहे. याच्या नियोजनाची बैठक डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या अध्यक्षते खाली नुकतीच पार पडली.

माजी उपमहापौर नानासाहेब काळे, नगरसेवक संभाजी आरमार कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे,इन न्यूज चॅनलचे संपादक समाधान वाघमोडे, उद्योजक मनीष सुरवसे, कर्मचारी संघटनेचे नेते शंतनू गायकवाड, आप्पासाहेब सावंत आदींच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या पूजनाने बैठकीची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ अध्यक्ष पदी जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे, कृष्णा सुरवसे यांच्या निवडीबद्दल यथोचित सत्कार देखील करण्यात आला. संभाजी आरमार शाही पालखी सोहळा प्रमुखपदी अर्जुन शिवसिंगवाले, सहप्रमुख पदी ॲड. रमाकांत बापट यांची निवड करण्यात आली. संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी (तात्या) वाघमोडे नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने निवडून आले आहेत. या निवडणुकीत त्यांच्या विजयासाठी परिश्रम घेतलेल्या कार्यकर्त्यांचा फेटा बांधून मोत्याची माळ घालून सत्कार करण्यात आला. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने हिंदुस्थानाचे उद्धारकर्ते असून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे प्रणेते आहेत. महिला, शेतकरी, धर्म, अर्थ, संरक्षण आदी सर्वच क्षेत्रात शिवरायांनी केलेले काम अनमोल आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रप्रेमी माणसाने शिवरायांची जयंती जल्लोषात साजरी केली पाहिजे असे आवाहन केले.


याप्रसंगी नगरसेवक शिवाजी वाघमोडे, उत्तरा बरडे, गुरुनाथ निंबाळे, नेताजी घोडके यांची समायोचित भाषणे झाली. संभाजी आरमारचे उपाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रास्ताविक तर शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी संभाजी आरमार प्रदेश संघटक प्रकाश डांगे, जिल्हाप्रमुख अनंतराव निळे, सरचिटणीस गजानन जमदाडे, शहर प्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, उपजिल्हाप्रमुख प्रमोद जगताप, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, महिला जिल्हा संघटक ॲड. गीता पवार, शहर प्रमुख उमा राजपूत, रेखा वनखडे, दिव्यांग प्रमुख वासुदेव होनकोंबडे, राज जगताप, सुधाकर करमकोट, मल्लिकार्जुन परळकर, मल्लिकार्जुन पोतदार, द्वारकेश बबलादीकर, यांच्यासह संभाजी आरमार चे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेच्या सभागृहात लोकशाही मूल्यांचे दर्शन घडावे

### सभा शास्त्र हे नियम नव्हे तर लोकशाहीचा श्वास ठरावे

२०१७ नंतर तब्बल चार वर्षे प्रशासकीय राजवटीखाली असलेली सोलापूर महापालिका अखेर पुन्हा लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हाती आली आहे. या निवडणुकीत भाजपाने ८७ जागा जिंकत महापालिकेवर निर्विवाद वर्चस्व मिळवले. त्या खालोखाल आठ जागांसह एमआयएम दुसऱ्या क्रमांकावर आहे. शिवसेना (शिंदे गट) चार, कॉंग्रेस दोन, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) एक जागा मिळवून सभागृहात उपस्थित आहे. महापालिका सभागृहात विविध पाच पक्षाच्या लोकप्रतिनिधीचा सहभाग राहणार आहे.



या राजकीय गणिताच्या पार्श्वभूमीवर पुढील पाच वर्षे होणाऱ्या सर्वसाधारण सभा केवळ औपचारिक न राहता लोकशाहीचे खरे व्यासपीठ ठरतील का, हा खरा प्रश्न आहे.

महापालिका ही स्थानिक पातळीवरील लोकशाहीची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. संसदीय लोकशाहीतील विकेंद्रीकरण प्रत्यक्षात कसे असते, याचे धडे इथे गिरवले जातात. १ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेली सोलापूर नगरपालिका आणि १ मे १९६४ रोजी महानगरपालिकेचा दर्जा मिळालेली ही संस्था समृद्ध राजकीय इतिहासाची साक्षीदार आहे. याच महापालिकेत तीन महापौर बिनविरोध निवडले गेले, याचा अर्थ संघर्षाइतकीच समन्वयाची परंपराही सोलापूरने अनुभवली आहे. कै. यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात होणाऱ्या प्रत्येक सभेत आदर्श लोकशाहीचे दर्शन घडणे आवश्यक आहे. सभा शास्त्र, नियम आणि शिस्त यांचे पालन झाले पाहिजे. सत्ताधारी असोत वा विरोधक असो प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याची संधी मिळालीच पाहिजे. ही संधी नाकारणे म्हणजे जनतेच्या आवाजावर गदा आणण्यासारखे आहे. भाषणांचा केंद्रबिंदू व्यक्ती किंवा समाजावर टीका करणे नसून शहराच्या विकासाचे प्रश्न असावेत. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शहर नियोजन यासारखे मुद्दे सभागृहात चर्चेच्या केंद्रस्थानी आले पाहिजेत. एखादा अधिकारी चुकीचा निर्णय घेत असेल, तर त्यावर प्रश्न विचारले जावेत मात्र ते सन्मानपूर्वक आणि नियमांच्या चौकटीत असावेत. लोकप्रतिनिधी आहोत, ही जाणीव प्रत्येक वाक्यातून दिसली पाहिजे. महापालिकेत जवळपास ५० टक्के महिला प्रतिनिधी असताना त्यांचा आवाज सभागृहात उमटणे तितकेच गरजेचे आहे. महिलांचे प्रश्न, अनुभव आणि दृष्टिकोन चर्चेत आले तरच निर्णय सर्वसमावेशक ठरतील. बोलण्याची संधी देणे आणि ती निर्भयपणे वापरणे, हे खऱ्या अर्थाने सक्षम लोकशाहीचे लक्षण आहे.महापालिकेच्या सभागृहात संख्याबळ नव्हे, तर लोकशाही मूल्ये निर्णायक ठरली पाहिजेत.




विरोधी पक्षांचे संख्याबळ जरी अत्यल्प असले तरी लोकशाहीत त्यांचे महत्त्व कमी होत नाही. त्यांना निधी, सन्मान आणि अभिव्यक्तीची संधी देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. भाजप हा शिस्तप्रिय राष्ट्रीय पक्ष आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेच्या सभागृहातही संयम, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांचे दर्शन घडावे, हीच अपेक्षा आहे. ८७ जागा हे संख्याबळ आहे पण इतिहासात नोंद होणार आहे ती लोकशाही किती जपली गेली, याची... ''नगरसेवा हीच ईश सेवा'' हे ब्रीद भिंतीपुरते न राहता कृतीत उतरले, तरच सोलापूरचा विकास आणि लोकशाही दोन्ही मजबूत होतील.

महापालिका सभेत नगरसेवकांनी नागरिकांचे प्रश्न मांडावेत. अभ्यासपूर्वक बोलावे. विषयाची कागदपत्रे, आकडे, नियम माहिती असतील तर सभेला वजन येते.नियम व सभाशास्त्र पाळावे. अध्यक्षांच्या सूचनांना मान देत ठराविक वेळेत मुद्देसूद बोलावे. सभ्य भाषा व संयम राखावा.मतभेद असले तरी वैयक्तिक टीका टाळावी. फक्त दोषारोप न करता पर्याय, सुधारणा आणि मार्गदर्शन द्यावे.उपाय सुचवावेत. सत्ताधारी-विरोधक असा भेद न करता शहरहिताला प्राधान्य द्यावे. लोकशाही मूल्य जपावीत. महापालिका सभेत नगरसेवकांनी काय करू नये तर आरडाओरडा, गोंधळ करू नये. घोषणा, आसनावरून उठून जाणे ही सभेची प्रतिष्ठा घालवते.वैयक्तिक आरोप व अपशब्द वापरू नयेत.चर्चा विषयावर असावी, व्यक्तीवर नको. अभ्यासाशिवाय बोलू नये. केवळ प्रसिद्धीसाठी वागू नये. कॅमेऱ्यासाठी गदारोळ नव्हे, कामासाठी आवाज उठवावा. महिलानगरसेवकांचे बोलणे दडपू नये. त्यांनाही समान संधी व सन्मान द्यावा. महापालिका सभा ही शहर घडवण्यासाठी असते, हे समजून घेतले पाहिजे.

सभा शास्त्र हे केवळ नियमपुस्तिकेतील कलम नसून लोकशाहीचा श्वास आहे. अध्यक्षांच्या आदेशाचे पालन, बोलण्याची वेळ आणि विषयाची मर्यादा पाळणे ही प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे. मुद्देसूद मांडणी, वेळेचे भान आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेची जाणीव या तिन्ही गोष्टी सभाशिस्तीचा कणा आहेत. बोलण्याची संधी देण्याची गरज आहे. केवळ त्यासाठी डायसच्या दिशेने पाण्याची बाटली फेकावी लागू नये. घोषणाबाजी, गोंधळ किंवा वैयक्तिक आरोप यामुळे सभेचा उद्देशच हरवतो. नियमांनुसार मागितलेली हरकत, सूचना किंवा लक्षवेधी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन, पॉईंट ऑफ ऑर्डर हीच सभागृहातील लोकशाहीची योग्य भाषा आहे. अध्यक्षांनी तटस्थपणे आणि धैर्याने सभेचे संचालन करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिस्तबद्ध सभा म्हणजे विकासाच्या निर्णयांना गती देणारी सभा, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. सर्वच कारभाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा...!

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### बार्शीत पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त

**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बार्शी उपविभागात कडेकोट पोलीस बंदोबस्त असतानाही गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण पथकाने (एलसीबी) बार्शी शहरातील वाणी प्लॉट परिसरात कारवाई करत एका तरुणाकडून देशी बनावटीचे गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे हस्तगत केली आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश सिद्धेश्वर कारटकर व त्यांच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, विपुल शिवाजी यादव (वय २९, रा. वाणी प्लॉट, बार्शी) हा विनापरवाना गावठी पिस्तूल बाळगून परिसरात फिरत आहे.



सदर माहिती तात्काळ वरिष्ठांना कळविण्यात आली असता, पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या आदेशानुसार कारवाईचे निर्देश देण्यात आले. यानंतर पंचांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वाणी प्लॉट परिसरात सापळा रचून पेट्रोलिंग करत असताना संशयित इसम आढळून आला. सोमवारी सायंकाळी त्यास घेराव घालून ताब्यात घेण्यात आले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कमरेला सिल्वर रंगाचे देशी बनावटीचे गावठी पिस्तूल, तसेच पॅन्टच्या खिशात केएफ ७.६५ कंपनीची दोन जिवंत काडतुसे मिळून आली. सदर शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना संशयित आरोपीकडे नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. जप्त करण्यात आलेल्या शस्त्र व काडतुसांची एकूण वापरती किंमत सुमारे ५०,४०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी संशयित आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ व २५, तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, याचा पुढील तपास पोलीस सहायक निरीक्षक उमाकांत कुंजीर करत आहेत.




### विद्या प्रबोधिनी इंग्लिश मीडियम स्कूल, कोळेगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पिलीव,दि. ५ फेब्रुवारी-**

विद्या प्रबोधिनी इंग्लिश मीडियम स्कूल,कोळेगांव ता माळशिरस येथे आयोजित करण्यात आलेले वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडले.या कार्यक्रमास माजी सरपंच रजनी दुपडे,पोलीस पाटील बिभीषण दुपडे,बाजार समितीचे संचालक नितीन सावंत,झेप फाउंडेशनचे संतोष माने तसेच आदर्श स्कूलचे नाईकनवरे उपस्थित होते. या कार्यक्रमास शाळेचे संस्थापक सतीश दुपडे, संस्थापिका रुपाली दुपडे, मुख्याध्यापिका प्रियांका बाबर यांच्यासह सहशिक्षक ज्ञानेश्वर सावंत,अश्विनी कुलकर्णी,श्रुती सावंत व पूजा वाघमारे उपस्थित होते. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे मन जिंकले. विद्यार्थ्यांच्या नृत्य, गीत व नाट्य सादरीकरणास उपस्थित मान्यवरांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन सावंत यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली. ते दरवर्षी शाळेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी बक्षिसे देत असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळत असून त्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ होत आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा प्रशासन, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.सूत्रसंचालन श्रीकांत दुपडे व माधुरी पवार यांनी केले.

### तुर्कपिंपरी शिवारातील 'त्या' मृतदेहाची ओळख पटली

**छळाला कंटाळून अल्पवयीन अश्विनीची आत्महत्या**

**बार्शी, दि.५ फेब्रुवारी**

तालुक्यातील तुर्कपिंपरी येथील बाळासाहेब वाघमोडे यांच्या शेत गट नं. १४७ मध्ये २९ जानेवारी रोजी एक कुजलेला मृतदेह आढळून आला होता. या मृतदेहाचे मस्तक धडावेगळे झाले होते आणि प्राण्यांनी लचके तोडल्याने ओळख पटवणे कठीण झाले होते. मात्र, घटनास्थळी सापडलेले कपडे आणि पायातील पैंजणावरुन मयत मुलीच्या वडिलांनी तिची ओळख पटवली आहे. अश्विनी पूरभाजी गाढवे (वय १७ वर्षे ११ महिने, रा. सध्या जकराया साखर कारखाना, मूळ रा. परभणी) असे मयत दुर्दैवी मुलीचे नाव आहे. प्रेमविवाह, सासरचा छळ आणि दुर्दैवी अश्विनी ही अल्पवयीन होती. ती १६ जुलै २०२५ रोजी पुण्यातील शिक्रापूर येथून आरोपी अभिषेक आश्रुबा बांगर (रा. मुंडेवाडी, ता. केज, जि. बीड) याच्यासोबत पळून गेली होती. त्यानंतर हे दोघे माढा तालुक्यातील केवड (बबनराव शिंदे साखर कारखाना युनिट) येथे ऊसतोडीसाठी आले होते. सोबत अभिषेकची आई सोजरबाई आश्रुबा बांगर ही देखील होती. तुला स्वयंपाक येत नाही आणि ऊसतोडीचे कामही जमत नाही, या कारणावरुन अभिषेक आणि त्याची आई सोजरबाई यांनी अश्विनीला सतत टोमणे मारुन मानसिक आणि शारीरिक त्रास दिला. या त्रासाला कंटाळून अश्विनीने १३ जानेवारीच्या रात्री ते १४ जानेवारीच्या पहाटेच्या दरम्यान कोपीमध्ये गळफास घेऊन केली. अश्विनीने केल्याचे पोलीस केस ऊसतोडीच्या ओढणीने आत्महत्या आत्महत्या समजल्यानंतर, होईल या भीतीने आरोपी अभिषेक आणि सोजरबाई यांनी कोणालाही न सांगता तिचा मृतदेह बैलगाडीतून नेला. त्यानंतर तुर्कपिंपरी शिवारातील एका शेतात खड्डा खणून हाताने माती लोटून मृतदेह पुरुन टाकला आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुत्र्यांनी हा मृतदेह उकरुन काढल्याने हे भयानक सत्य जगासमोर आले. पोलिसांनी मयत मुलीचे वडील पूरभाजी वामनराव गाढवे यांना बोलावून मृतदेहाचे फोटो आणि सापडलेले साहित्य दाखवले असता, त्यांनी मुलीच्या पायातील पैंजणावरून हे पैंजण मीच तिला घेऊन दिले होते. असे सांगत ती आपलीच मुलगी अश्विनी असल्याचे ओळखले. मयत मुलीचे वडील पूरभाजी गाढवे यांच्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अभिषेक आश्रुबा बांगर आणि सोजरबाई आश्रुबा बांगर (दोघे रा. मुंडेवाडी, ता. केज, जि. बीड) यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि पुरावा नष्ट करणे या गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मामासाहेबांनी शिक्षण प्रसारातून माणसे उभी केली : मिलींद जोशी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.५ फेब्रुवारी-**

बार्शीने महाराष्ट्राला खूप मोठी माणसे दिली. मामासाहेब हे कर्तृत्वाचे एक उत्तुंग शिखर होते. बोर्डिंगच्या माध्यमातून मामांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. मामांनी संस्थेबरोबरच माणसे उभी केली असे प्रतिपादन अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलींद जोशी यांनी येथे केले.

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त समाजदिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे होत्या. यावेळी व्यासपीठावर आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, बार्शीच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी.पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे उपस्थित होते. प्रा. जोशी पुढे म्हणाले, सध्या शिक्षणात खूप मोठया संधी उपलब्ध आहेत. उपलब्धचे उपयुक्त मनुष्यबळात रुपांतर आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेच्या काळात तंत्रज्ञान सक्षम होणे गरजेचे आहे. विदयार्थ्यांना पदवीतील गुणांबरोबरच कौशल्ये गरजेची आहेत. औद्योगिक व आरोग्य क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे. शिक्षकांचे ताण वाढत आहेत. ज्ञान सत्तेचा दरारा कमी होत आहे. चांगले व योग्य करिअर यांचा समन्वय गरजेचा आहे. सर्जनशीलता, कल्पकता, वेगळ्या वाटा शोधणारी शिक्षण पद्धती गरजेची आहे. नैराश्यवादाचे मोठे संकट उदयास येत आहे. निराश होऊ नका. संकटावर मात करा. न्यूनगंड, भयगंड व अपराधगंड याला बळी पडू नका. आतून ज्ञानाचे पंख निर्माण करणारी शिक्षण पद्धती गरजेची आहे. आपल्या कलागुणांना वाव द्या, असे त्यांनी सांगितले. साहित्यिक डॉ. ढेरम्हणाल्या, मामांची साधी राहणी होती. बहुजनांच्या उन्नतीचे व समाज परिवर्तनाचे साधन आहे. लोकसंस्कृतीत महिलांचे मोठे योगदान आहे. शिक्षणातूनच महिलांना आत्मविश्वास दिला. आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात मानवी बुद्धिमत्तेचे महत्व कमी होऊ देऊ नका. तरुण हे आपल्या देशाचे भांडवल आहे. आयुष्याची माती लावून काम करा. उद्याची गाणी लिहिली जाणारी पिढी निर्माण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी सातारा येथील शहीद जवान अमर शामराव पवार व अहिल्यानगर येथील शहीद जवान संदीप पांडुरंग गायकर यांच्या वीर माता-पिता, वीर पत्नी व वीर सुपुत्र यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी गंगाराम पवार यांनी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांनी स्वागतपर संबोधन केले. खजिनदार जयकुमार शितोळे यांनी प्रास्ताविक केले. जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. पाहुण्यांचा परिचय डॉ.आर.ए. फरडे यांनी करुन दिला. अध्यक्षांचा परिचय डॉ.रविकांत शिंदे यांनी करुन दिला. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संगीत विभागाने कर्मवीरांची आम्ही लेकरे हे स्वागत गीत सादर केले. सूत्रसंचालन डॉ. आसावरी फरताडे व डॉ. रविकांत शिंदे यांनी केले. ए.पी. देबडवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, शाखाप्रमुख, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, हितचिंतक, कर्मवीर प्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.





### प्रा. डॉ. पालके लिखित कर्मवीर प्रेरणा या पुस्तकाचे प्रकाशन




याच कार्यक्रमात येथील प्रा. डॉ. राहुल पालके यांनी लिहिलेल्या कर्मवीर प्रेरणा या पुस्तकाचे प्रकाशन अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद जोशी व साहित्यिका डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकास जयकुमार शितोळे यांची प्रस्तावना आहे. डॉ. बी. वाय. यादव व प्रा.डॉ. सुब्राव जाधव यांचे अभिप्राय आहेत. डॉ. पालके यांनी पुस्तकातून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्काराने सन्मानित व्यक्तिमत्वांचा जीवनप्रवास रेखाटलेला आहे.

## भुसावळ ते पंढरपूर रेल्वे चालू करण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.५ फेब्रुवारी -**

भुसावळ ते पंढरपूर ही रेल्वे चालू करण्यात यावी. यामुळे रेल्वेच्या उत्पन्नात वाढ होईल व भाविकांची सोय होणार आहे. त्यामुळे भुसावळ ते पंढरपूर ही रेल्वे चालू करण्यात यावी अशी मागणी सोलापूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी पंढरपूर विधानसभा अध्यक्ष महेश अधटराव यांनी पंढरपूरचे स्टेशन प्रबंधक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पंढरपूर येथे वर्षात आषाढी, कार्तिकी या दोन मोठ्या व माघी व चैत्री या दोन लहान यात्रा भरत असतात.त्याचबरोबर महिन्याच्या एकादशीला देखील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनाला येतात. विशेष म्हणजे भुसावळ-जळगांव-पाचोरा-चाळीसगाव या भागातील पंढरपूरात येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. त्यांच्या सोयीसाठी भुसावळ ते पंढरपूर ही रेल्वे चालू करण्यात यावी. रेल्वेच्या उत्पन्नातही वाढ होईल व भाविकांची सोय होईल. सध्या जळगांववरून दिल्ली ते बेंगलोर ही गाडी सुपरफास्ट असून याचा पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना कोणताही फायदा होत नाही. ही गाडी कुर्डुवाडी येथे थांबते त्यामुळे भाविकांना तेथून दुसऱ्या खाजगी व इतर वाहनांनी पंढरपूरला यावे लागते. त्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी भुसावळ वरून थेट पंढरपूरसाठी विशेष रेल्वे चालू करण्यात यावी यामुळे त्या भागातून येणाऱ्या भाविकांची मोठी सोय होईल व रेल्वेच्या उत्पन्नात वाढ होईल असेही या निवेदना म्हटले आहे. या निवेदनावर पंढरपूर शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष संदिप शिंदे, जिल्हा सरचिटणीस पांडुरंग डांगे, काँग्रेस व्यापारी सेलचे आण्णा पवार, युवक शहर उपाध्यक्ष रवि अग्रवाल, संग्राम मुळे व सचिव अक्षय वनसाळे आदि काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पिलीव येथे शेळ्यांची चोरी, नागरिकांमध्ये घबराट

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात पुन्हा एकदा शेळ्या चोरीचे सत्र सुरु झाल्या मुळे नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे.पिलीव येथील नितीन काळे यांनी देवाला सोडलेली दोन बोकडे चोरट्यांनी चोरुन नेली .अंदाजे या दोन बोकडांची किंमत तिस हजार रुपयांच्या आसपास असेल तर बाजार तळाजवळील पाखरे यांची शेळी चोरुन नेली .तर काळा मळ्यातही दोन शेळ्या चोरुन नेल्या आहेत. पिलीव परीसरात गेल्या एक दोन वर्षापुर्वी शेळ्या चोरीचे सत्र मोठ्या प्रमाणावर सुरू होते .त्यानंतर ऐन यात्रा काळात पिलीव परीसरात पुन्हा एकदा शेळ्या चोरीचे सत्र सुरू झाले आहे नितीन काळे यांची बोकड रात्री एकच्या सुमारास नंबर प्लेट नसलेल्या गाडीतून चोरुन नेल्याचे नागरिकांनी सांगीतले. सदरच्या चोऱ्यांवर पोलीसांनी लक्ष ठेवुन ताबडतोब याचा अटकाव करण्याची मागणी नागरिकांमधुन होत आहे.

## शब्दांगण पुरस्काराने इंद्रजीत पाटील सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.५ फेब्रुवारी-**

शब्दांगण बहुउद्देशीय ज्ञान प्रबोधिनी संस्था, चंद्रपूर व्दारा आयोजित राज्यस्तरीय शब्दांगण साहित्य पुरस्कारासाठी इंद्रजीत पाटील यांच्या 'शेलक्या बारा' या कथासंग्रहाची निवड झाली होती. स्व.लक्ष्मी तुकाराम जी सूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा राज्यस्तरीय पुरस्कार लेखक इंद्रजीत पाटील यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या या कथासंग्रहास मिळालेला हा तेरावा राज्यस्तरीय पुरस्कार असून त्यांच्या 'कळ पोटी आली ओठी' या अष्टाक्षरी कवितासंग्रहासही दहा व एकूण साहित्यिक कामगिरीसाठी इतर सात असे २०२४ या वर्षासाठी तीस राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.शब्दांगण संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.अनंता सूर यांनी हा पुरस्कार त्यांना सन्मानपूर्वक प्रदान केला.



सन्मानचिन्ह, सन्मानपत्र,शाल,श्रीफळ व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. ग्रामीण भागातील या प्रतिभाशाली साहित्यिकाची गरूडभरारी पाहून श्री. माधवरावजी कुतवळ, पंडितराव लोहोकरे, चंद्रकांत पाटील,रावसाहेब पाटील,संजय भड, अमोल देशमुख, जीवराज गरड यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ फेब्रुवारी -**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात उपमुख्यमंत्री तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.



येथे आयोजीत शोकसभेस संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य बाळासाहेब पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, जी. बी. भायगुडे, यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता साळवे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. सुशीलकुमार शिंदे, डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाते डॉ. समाधान माने, डॉ. अनिल चोपडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अमर कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. पदव्युत्तर पदवी विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकताना त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, तत्परता, संवेदनशील नेतृत्व, तसेच आर्थिक-सामाजिक क्षेत्रातील धाडसी निर्णयांचे स्मरण केले. रयतच्या विकासासाठी अजित पवार यांनी दिलेले योगदान भरीव असून, विद्यार्थीहिताचे उपक्रम, रयत विज्ञान परिषदेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उभारणीचा संकल्प व तात्काळ मदतीची घोषणा यांचा उल्लेख करण्यात आला. विविध समित्यांमध्ये त्यांनी कार्यकर्ता,मार्गदर्शक व नेता म्हणून बजावलेली भूमिका उल्लेखनीय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी अजित पवार हे अभ्यासू, कार्यक्षम व जनसामान्यांशी नाते जपणारे नेतृत्व असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर आभार समारंभ समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी मानले. या शोकसभेस महाविद्यालयातील वरिष्ठ-कनिष्ठ, व्होकेशनल विभागातील कर्मचारी तसेच रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधील सेवानिवृत्त शिक्षक व रयतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात

### तब्बल ८५ हजार ८५९ रूपयांच्या पारितोषिकांचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

मराठा मंदिर श्री शहाजी प्रशाला स्वातंत्र्यपूर्व काळातील शतकोत्तर वाटचाल करणारी सर्वात जूनी प्रशाला आहे. या प्रशालेला समृद्ध गुरू- शिष्य परंपरा लाभली आहे. या प्रशालेतील ज्ञानी सदगुरू शिक्षक यांनी वर्षानुवर्षे ज्ञानदानाचे काम केले आहे. त्यामुळे तुम्ही खूप भाग्यवान आहात की या ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या प्रशालेत शिकत आहात. ज्ञान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. त्यामुळे ज्ञानी बना असा सल्ला मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी दिला.

येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेचा वार्षीक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन कल्याणशेट्टी बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. एस.पडवळकर होते. यावेळी निमंत्रित सदस्य एस. एन. फडतरे, बाबासाहेब निंबाळकर, डॉ. के.एस. झिपरे, कार्याध्यक्ष एम. बी. मुन्नोळी, पर्यवेक्षक वाय. पी. कबाडे, नगरसेवक महेश इंगळे, प्रवीण शहा, रमेश कापसे, अविनाश मडीखांबे, सद्दाम शेरीकर, अल्फिया कोरबु, स्नेहा खवळे, राजेश जाधव यांच्यासह एम.बी.पाटील, माजी मुख्याध्यापक आर. एल.बनसोडे, विदयार्थीनी प्रतिनिधी प्रणया साळुंखे, जनरल सेक्रेटरी प्रज्ञेश साळुंखे व जॉईंट सेक्रेटरी सई जगदाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मानवंदना व शालेय प्रार्थना घेण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विशेष बाब म्हणून अक्कलकोट नगरपरिषदेवर निवड झालेले प्रशालेचे माजी विद्यार्थी नूतन नगरसेवक महेश इंगळे, प्रवीण शहा, रमेश कापसे, अविनाश मडीखांबे, सद्दाम शेरीकर, अल्फिया कोरबु, स्नेहा खवळे यांचा ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. स्वागत प्रास्ताविक पर्यवेक्षक वाय पी कबाडे यांनी केले तर अहवाल वाचन कार्याध्यक्ष एम. बी. मुन्नोळी यांनी केले. प्रशालेच्या वतीने विविध मान्यवरांनी ठेवलेली ८५ हजार ८५९ रूपयाची बक्षीसे वाटण्यात आली. प्रशालेतील बालचमुनी स्वागतगीत सादर केले. विदयार्थीनी प्रतिनिधी, जनरल सेक्रेटरी व जॉईंट सेक्रेटरी यांनी मान्यवरांना मानचिन्ह प्रदान केले. याप्रसंगी प्रशालेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पारितोषिक यादीचे वाचन एस.व्ही. गोडसे, एस.एन.गायकवाड, एम.एस.अहिरे, एस.बी. पवार, महाडकर यांनी केले. सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख जे.एस.बगले यांनी केले तर आभार पी.एस.पापरकर यांनी मानले. या कार्यक्रमाला अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष व निमंत्रित सदस्य अमोलराजे भोसले यांनी शुभेच्छा संदेश दिला. यावेळी पालक, माजी शिक्षक, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




प्रशालेतील दहावी गुणवंत विद्यार्थ्यांना तब्बल ८५ हजार ८५९ रूपयांची रोख पारितोषिके वाटली. प्रशालेत प्रथम आलेल्या स्वामीनी शिंपी या विद्यार्थिनीस २५ हजार २०० रूपयांची पारितोषिके मिळाली. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

विशेष बाब म्हणून अक्कलकोट नगरपरिषदेवर निवड झालेले प्रशालेचे माजी विद्यार्थी नूतन नगरसेवक महेश इंगळे, प्रवीण शहा, रमेश कापसे, अविनाश मडीखांबे, सद्दाम शेरीकर, अल्फिया कोरबु, स्नेहा खवळे यांचा ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

